22-04-2025-Dai-02-New_DH_PAN_28_04_2016-2.qxp 4/21/2025 9:38 PM Page 1




**TRANSFER OF VEHICLE**

Notice is hereby given that my **Husband Late Shaikh Salim Razak Shaikh** expired, is the owner of **Maruti Dzire VXI Tourist Taxi** bearing **Reg. No. GA-06-T-6824,** having **Permit No. STA/AITTP/ 202000529.** The above vehicles/ permit is now being transferred in my name **Sana Salim Shaikh,** Wife of Late Shaikh Salim Razak Shaikh, R/o. H.No. 640/2, C.P. OS MESS, Alto Mangor, Vasco da Gama, South Goa 403802.

If any one has any objection kindly contact Director of Transport, Panaji-Goa & Asst. Director of Transport, Vasco Goa **within 15 days** from the publication of this notice.

**Date: 21.04.2025** Sd/- **Mrs. Sana Salim Shaikh**

*Sandeep Ads*



**नावातील बदल**

मी, **श्रीमती फ्रान्सिस्का ॲलेझिन्हा फर्नांडिस,** राहणार घर क्र. ३२७, पोयटोमाडो, कुंकळ्ळी, दक्षिण गोवा माझ्या भारतीय पासपोर्ट क्र. पी १९९३१३७ वरील माझे नाव व पत्ता अनुक्रमे **फ्रान्सिस्का ॲलेझिन्हा फुर्ताडो इ फर्नांडिस** हे बदलून **फ्रान्सिस्का ॲलेझिन्हा फर्नांडिस** आणि बामणसाय, सांगे, गोवा ते घर क्र. ३२७, पोयटोमाडो, कुंकळ्ळी, दक्षिण गोवा असे बदलू इच्छिते. तसेच मी माझ्या वडिलांचे नाव **मरीनो फर्नांडिस** ते **मारियानो फर्नांडिस** आणि आईचे नाव **पिएदाद मिनेझिस** ते **पिएदाद रोझारिया मिनेझिस** आणि माझ्या पतीचे नाव **इरोई व्हिन्सेंट फुर्ताडो** ते **इरोल व्हिन्सेंट फुर्ताडो** असे बदलू इच्छिते. यानंतर माझे सर्व व्यवहार व कागदपत्रांमध्ये मी **फ्रान्सिस्का ॲलेझिन्हा फर्नांडिस** या नावानेच ओळखली जाईल.

सही/ –**फ्रान्सिस्का ॲलेझिन्हा फर्नांडिस**


# साखळी महाविद्यालयाने दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

## टाकाऊ कपडे, रिकाम्या दूध पिशव्या संकलन मोहीम उत्साहात

■ *टीम दैनिक हेराल्ड*



साखळी : संकलित केलेल्या कपड्यांसोबत डाव्या बाजूला ग्रंथपाल समीर फत्ते, अधिकारी स्टीफन फर्नांडिस, प्राचार्य नामदेव गावस, उपप्राचार्य रोझालिना डिसिल्वा.

**पर्वरी, दि. २१** : कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी येथील एनएसएस विभागाच्या वतीने टाकाऊ कपडे आणि रिकाम्या दूध पिशव्या यांचे संकलन करून या अूनोख्या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला आहे. 'संपूर्ण अर्थ एनव्हायर्नमेंटल सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड' आणि 'गोवा मिनरल फाउंडेशन' यांच्या सहकार्याने टाकाऊ कापड कचरा संकलन मोहीम आखण्यात आलेली होती. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी या संकलन मोहिमेत भाग घेतला. या संकलन मोहिमेतून एकूण १५१ किलो टाकाऊ कापड कचरा गोळा करण्यात आला. या मोहिमेमुळे कापड कचरा कमी होण्यास हातभार लागून हा कचरा जाळला न गेल्यामुळे पर्यावरणाच्या प्रदूषणाला आळा बसणार आहे. याबरोबरच रिकाम्या दूध पिशव्या संकलन मोहीम ही मिनरल फाऊंडेशनच्या सहकार्याने साखळी सरकारी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आली होती. या मोहिमेचा उद्देश नागरिकांनी कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व पटवून देणे आणि रिकाम्या दूध पिशव्यांचा पुनर्वापर करणे हा होता. या मोहिमेत महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या संकलन मोहिमेदरम्यान एकूण ७८ किलो रिकाम्या दुधाच्या पिशव्या गोळा करण्यात आल्या. या पिशव्यांवर प्रक्रिया करून त्याचा उपयोग इतर प्लास्टिक उत्पादने बनविण्यासाठी केला जाणार आहे. या दोन्ही मोहिमेंचे आयोजन एनएसएस कार्यक्रम अधिकारी स्टीफन फर्नांडिस यांनी केले.

## पान १ वरून

### 'आम्हाला बायपासच हवा'; भोमवासीय मागणीवर ठाम

मुख्यमंत्र्यांनी गावकऱ्यांना आश्वस्त करण्याचा प्रयत्न केला की, प्रस्तावित फ्लायओव्हरमुळे केवळ चार घरे बाधीत होणार असून इतर कोणत्याही घराला किंवा कोणत्याही मंदिराला किंचितही बाधा पोहोचत नाही. तसेच गावकऱ्यांच्या पारंपरिक मार्गातही कोणातही अडथळा येत नाही. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या या उत्तराने गावकाऱ्यांचे समाधान झाले नाही.

गावकऱ्यांनी भीती व्यक्त केली की, हायवे विभागाकडून ६० मीटरचा रस्ता करण्यात येणार आहे. आराखडा सादर करताना हायवेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या स्पष्टीकरणांवर आमचा विश्वास नाही, असे या बैठकीला हजर असणारे ज्येष्ठ ग्रामस्थ पुतू गावडे यांनी सांगितले. बायपासच्या आमच्या मागणीवर आम्ही ठाम असून हायवे अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जाग्यावर येऊन हायवेची हद्द दाखवल्यानंतर आणि सरकारकडून तशी लेखी हमी मिळाल्यानंतर आम्ही आमची पुढची भूमिका स्पष्ट करू, असे त्यांनी सांगितले. गेली अनेक वर्षे या आंदोलनांचे नेतृत्व करणारे संजय नाईक यांना या बैठकीत का सामावून घेण्यात आले नाही याचे उत्तरही मुख्यमंत्र्यांनी द्यावे, असा आग्रह गावडे यांनी धरला. या बैठकीला उपस्थित असेलेले आणखी एक भोमवासीय किशोर नाईक यांनी सांगितले की, या नकाशात आधीच दोन पर्यायी मार्ग दाखवण्यात आले आहेत. या पर्यायी मार्गावरच सरकारने हायवे बांधकाम करावे. बायपास ही आमची मागणी ठाम आहे.

प्रत्यक्ष जाग्यावर येऊन प्रस्तावित महामार्गाची हद्द दाखवण्यात यावी या गावकऱ्यांच्या मागणीला मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत सकारात्मक प्रतिसाद दिला असून ही हद्द निश्चित करण्यासाठी महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मंगळवारी भोम गावात दाखल होणार आहेत. ही हद्द निश्चिती झाल्यानंतर गावकऱ्यांचे सर्व गैरसमज दूर होतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे. बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, भोम येथील गावकऱ्यांना चुकीची माहिती सांगून कोणीतरी जणीवपूर्वक भडकवत आहे. भोमवासीयांच्या बायपासच्या मागणीवर बोलताना त्यांनी सांगितले की, २००७ ला हा आराखडा निश्चित झाला आहे. त्यात आता बदल करायचा झाल्यास खाजन अनेक गोष्टीची नव्याने परवानगी घ्यावी लागेल, ज्यामध्ये खाजन जमिनही येण्याची शक्यता आहे. या प्रक्रियेला भरपूर वेळ लागू शकतो .

### काँग्रेसकडून मंत्री गावडेंच्या राजीनाम्याची मागणी

महिन्याभराची मेहनत घेतो. त्यावेळी तांत्रिक अडथळे येणे हे अत्यंत वेदनादायक असते. दुर्दैव म्हणजे, मंत्री स्वतः कलाकार असूनही कलाकारांचे दुःख समजून घेण्याऐवजी त्यांना 'सुपारीबाज' अशी अवहेलना करतात.

जर कलाकारांनी गैरसोयींवर प्रश्न उपस्थित केले, तर त्यांना अशाप्रकारे हिणवले जाणे म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अपमान आहे. आपण लोकशाहीत आहोत आणि प्रत्येक नागरिकाला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे, असेही गावकर म्हणाले. दरम्यान, नुकत्याच घडलेल्या काही घटनांमुळे कला अकादमी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. शरद पोंक्षे यांचे मराठी नाटक प्रकाशयोजनेच्या अडचणींमुळे अडथळले गेले होते. त्यानंतर केवळ आठवडाभरातच, अभिनेते भरत जाधव यांच्या 'श्रीमंत दामोदरपंत' या नाटकादरम्यान एअर कंडिशनिंग प्रणालीने काम करणे थांबवले, ज्यामुळे प्रेक्षक व कलाकारांना गैरसोयींचा सामना करावा लागला.

### आधार नोंदणी प्रक्रियेत बनावट पत्त्यांचा वापर

जर अशा व्यक्तींनी त्या पत्त्यावर कोणतेही आर्थिक किंवा कायदेशीर व्यवहार केले, तर त्याचा त्रास खऱ्या रहिवाशांना सहन करावा लागू शकतो.

या पार्श्वभूमीवर, रहिवाशांनी अधिकाऱ्यांना आधार नोंदणी प्रक्रियेत अधिक काटेकोर पडताळणी यंत्रणा राबवण्याची मागणी केली आहे. 'यूआयडीएआय' ने स्थानिक स्वराज्य संस्था आणि गृहनिर्माण सोसायट्यांच्या मदतीने पत्त्यांची खातरजमा करावी. विशेषतः भाड्याने राहणाऱ्या अर्जदारांच्या बाबतीत मालमत्ताधारकांकडून प्रत्यक्ष पुष्टी घेणे आवश्यक आहे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. या प्रकरणामुळे आधार नोंदणीतील पारदर्शकता, कायदेशीर अचूकता आणि समुदायातील जागरूकता वाढवण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

### दोनापावल दरोडा प्रकरणाच्या तपासासाठी अनेक पथके स्थापन

सकाळी घरकाम करणाऱ्या नोकराने पोहोचल्यावर ही घटना उघडकीस आली आणि त्यांना जोडप्याला बांधलेले आढळले. दरम्यान, सामाजिक कार्यकर्त्या सेसिल रॉड्रिग्ज म्हणाल्या, ताळगाव मतदारसंघात दोन ज्येष्ठ नागरिकांना चार तास बांधून ठेवण्यात आले. आम्ही बऱ्याच काळापासून कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा उपस्थित करत आहोत. येथे सुमारे सहा ते सात लोक एका घरात घुसले जिथे सुरक्षा रक्षक आणि कॅमेरे होते. हे नियोजनबद्ध पद्धतीने केले गेले आहे. संपूर्ण घराची तोडफोड करण्यात आली आहे. हे हृदयद्रावक आहे. ग्रामीण भागात अशा घटना घडताना आपण ऐकत असू. आता शहरातही घडत आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडालेला आहे .


**IN THE COURT OF THE INSPECTOR OF SURVEY & LAND RECORDS, CITY SURVEY, MAPUSA, BARDEZ, GOA**

**Case No. ISLR / DEM / BAR / TIV / 36 / 2025**

1. Mr. Bapu Apa Ambekar 2. Tulsi Bapu Ambekar, Both R/o H. No. 208/1, Khodai Wada, Thivim, Bardez, Goa ......Applicants

V/s

1. Hirabai Pandurang Pednekar 2. Sricanta Shankar alias Xencora Pednekar 3. Ashalata Shankar alias Xencora Pednekar alias Ashalat V. Lotlikar 4. Sugabdhi Shankar alias Xencora Pednekar 5. Prakash Shankar alias Xencora Pednekar 6. Ashish Prakash Pednekar 7. Shankar Prakash Pednekar, All R/o Khodia Waddo, Tivim, Bardez, Goa 8. Dinesh Janardhan Kenavadekar alias Dinesh J. Kenavadekar, R/o Plot No. 58/E, Ganeshpuri, Bardez, Goa ......Respondents

**PUBLIC NOTICE**

Whereas, the above named applicant has moved an application to this Court for Demarcation of HIS/HER/THEIR/ITS share under section 114 of Land Revenue Code 1968 in respect of property surveyed bearing Survey No. **348/1** of Village **Tivim** of Bardez Goa.

AND WHEREAS, applicant served the notices through Registered A.D to the adjoining holders.

AND WHEREAS, notices are returned back from the postal authority with the endorsement "Party Expired, Party Left, Address not Known" etc.

AND WHEREAS, the applicant has made an application dated 16/04/2025 and prayed for service of summons by issuing Public Notice in any local daily under order V Rule 20(1-A) of Civil Procedure Code, 1908 as the applicant has stated their inability to submit the detailed addresses of the above respondents.

NOW THEREFORE, notice is hereby given to the applicant who thereby shall remain present in the office of Inspector of Survey and Land Records, City Survey, Mapusa on **30/04/2025** at **10.00 A.M.** onwards in order to proceed to the site with the Field Surveyor **Shri Vivek Bude**. The respondent / adjoining land holder are requested to remain present at site on scheduled date i.e. **30/04/2025 at 10.30 A.M.** onwards.

The applicant is further requested to clear the bushes on the boundary line, if it has been not done so far and arrange two labourers at site for helping the Surveyor for measurement work at the time of survey.

After completion of survey work your say will be recorded in the inspection report.

**You are further directed to remain present before this Court on 15/05/2025 @ 11.00 a.m. and give your say in the matter if any, failing which the case will be heard and decided in your absence.**

Given under my hand the seal of this Court on this 17th day of April, 2025

Sd/- **Patrick H. Gonsalves** Seal
Inspector of Survey & Land Records,
City Survey, Mapusa


## बांदेश्वर कलशारोहणाचा शुक्रवारी वर्धापनदिन



■ *टीम दैनिक हेराल्ड*

**बांदा, दि. २१** : येथील प्रसिद्ध जागृत स्वयंभू श्री देव बांदेश्वर मंदिर कलशारोहण सोहळ्याच्या नवव्या वर्धापन दिनानिमित्त शुक्रवार, दि. २५ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८ वाजता गणपती पूजन, देवतास नारळ, विडे अर्पण करून सामुदायिक गाऱ्हाणे, ८.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत श्री देव बांदेश्वर मंदिरात रुद्र अभिषेक अनुष्ठान, श्री देवी भूमिका मंदिरात श्री सूक्त आवृत्ती अनुष्ठान, श्री गणेश मंदिरात गणपती अथर्वशीर्ष आवृत्ती जप अनुष्ठान होईल. दुपारी महाआरती व महाप्रसाद, सायंकाळी ४ ते ७ वाजता स्थानिक मंडळाची भजने होतील. रात्री ७ ते ९ युवा कीर्तनकार ह. भ. प. विनीत महाराज म्हात्रे ,डोंबिवली यांचा कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. गायक कृष्णा पाटील व पखवाज विकास कोकतरे साथसंगत करणार आहेत. रात्री ९ ते १२ वाजेपर्यंत पालखी सोहळा होणार आहे.

कलशारोहण वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन श्री देव बांदेश्वर भूमिका देवस्थान यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# लाडफे – हरिजनवाडा रखडलेल्या रस्त्याच्या कामाला चालना

▶ ४० लाख खर्चून आमदार डॉ. शेट्ये यांच्या हस्ते डांबरीकरणाचा शुभारंभ

■ *टीम दैनिक हेराल्ड*



लाडफे : येथील मुख्य रस्ता ते अस्मिता परवार घरापर्यंत रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करताना आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये. सोबत पद्माकर मळीक, नरेश गावस, तुळशीदास गावकर, अनंत मळीक, अभियंता रश्मी मयेकर व इतर.

**साळ, दि. २१** : लाटंबार्से पंचायतक्षेत्रातील लाडफे हरिजनवाडा येथील कित्येक वर्षांपासून रखडलेल्या रस्त्याच्या कामाला चालना मिळाली असून सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे लाडफे येथील मुख्य रस्ता ते अस्मिता परवार घरापर्यंतच्या अंदाजे सातशे मीटर लांबीच्या रस्त्याला अंदाजे ४० लाख खर्चून नव्याने डांबरीकरण कामाचा शुभारंभ नुकतेच डिचोली मतदारसंघाचे आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला.

या शुभारंभप्रसंगी त्यांच्या सोबत जिल्हा पंचायत सदस्य प्रदीप रेवोडकर, स्थानिक पंच पद्माकर मळीक, नरेश गावस, माजी सरपंच तुळशीदास गावकर, अनंत मळीक, बाबू चननकर, महेश गावस, सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सहायक अभियंता रश्मी मयेकर तसेच गावचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या नेतृत्वाखाली जनतेला वीज, पाणी व रस्ते या मूलभूत गरजा पुरवण्यासाठी सरकार कटिबद्ध असून त्यातच सखल भागातील जनतेच्या विकासकामावर बारीक लक्ष ठेवून असल्याचे त्यांनी सांगितले. विकासकामाला जनतेचेही चांगले सहकार्य मिळत असल्याचे आमदार डॉ. शेट्ये यांनी सांगितले.

पंच पद्माकर मळीक यांनी आमदार डॉ. शेट्ये यांना जनतेचे पूर्ण सहकार्य लाभत असून दुर्लक्षित अशा रस्त्याच्या कामाला चालना मिळाल्याने पंच मळीक यांनी आमदारांचे आभार मानले.

# म्हापशात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

■ *टीम दैनिक हेराल्ड*



म्हापसा : उपस्थितांना संबोधित करताना प्रमुख पाहुणे गुरुदास नाटेकर. बाजूला सुधीर कांदोळकर, शंभू भाऊ बांदेकर, प्रकाश बांदेकर, अरविंद कोरगांवकर, विश्वनाथ कोरगावकर, समर्थ नाटेकर व ध्रुव कुडाळकर.

**म्हापसा, दि. २१** : समाजोन्नती संघटना बार्देश शाखेतर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती नुकतीच म्हापसा येथील तुळशीराम सभागृह येथे साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक डॉ. गुरुदास नाटेकर, तर खास निमंत्रित म्हणून नगरसेवक तथा माजी नगराध्यक्ष सुधीर कांदोळकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजोन्नती संघटना मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष शंभू भाऊ बांदेकर होते. यावेळी व्यासपीठावर समाजोन्नती संघटना बार्देश शाखेचे अध्यक्ष प्रकाश आपा बांदेकर, सचिव अरविंद कोरगांवकर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्वलनाने झाली. प्रकाश बांदेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विश्वनाथ कोरगांवकर आणि समर्थ यदूराम नाटेकर यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी डॉ. नाटेकर यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची माहिती देणारे भाषण झाले. सुधीर कांदोळकर, शंभू भाऊ बांदेकर यांनी यावेळी उपस्थितांना संबोधित केले. तसेच सत्कारमूर्ती विश्वनाथ कोरगावकर आणि समर्थ यदूराम नाटेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

आभार प्रदर्शन अरविंद कोरगावकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ध्रुव कुडाळकर यांनी केले.

# हरमल पंचायतीतर्फे पोलिस निरीक्षकांचे स्वागत

■ *टीम दैनिक हेराल्ड*



हरमल : मांद्रे पोलिस निरीक्षक गिरेंद्राल नाईक यांचे स्वागत करताना सरपंच अनुपमा मयेकर. सोबत उपसरपंच सोनाली माज्जी, पंच भिकाजी नाईक व संतान फर्नांडिस.

**हरमल, दि. २१** : मांद्रे पोलिस स्थानकाचे नवीन पोलिस निरीक्षक गिरेंद्र नाईक यांनी हल्लीच ताबा स्वीकारला. हरमल पंचायत सरपंच अनुपमा मयेकर व पंचमंडळाने भेट घेऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी उपसरपंच सोनाली माज्जी, पंच संतान फर्नांडिस, भिकाजी नाईक उपस्थित होते. हरमल पंचायतक्षेत्रात तसेच सुंदर समुद्रकिनाऱ्यावर कायदा, सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन सरपंच मयेकर यांनी व्यक्त केले.

दरम्यान, मागील गुन्हेगारी प्रकरणाचा छडा लावण्यासाठी कसून तपासणी करण्याची मोहीम राबवली जाईल व पीडितांना न्याय मिळेल, अशी अपेक्षा आहे.

या किनारी भागांत परप्रांतीय व्यावसायिक तसेच रशियन, नायजेरियन युवतीचा रात्रीस खेळ चाले',मसाज पार्लर, फिरते लमाणी विक्रेते, गैरव्यवहार रोखण्याचे जबरदस्त आव्हान पोलिस निरीक्षक गिरेंद्र नाईक यांच्यासमोर असून आटोक्यात आणण्यासाठी कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिक व व्यावसायिकांनी केली आहे.


**PUBLIC NOTICE**

Date: 21/04/2025

Notice is hereby given to the general public that my client intends to purchase all that said properties described in the **SCHEDULE** below from the legal heirs/successor of late Anthony Francis de Souza alias Antonio Francisco D'Souza alias Anthony Francis Dsouza alias alias Antonio Francis de Souza and his wife Late Rofina Theodoria D'Souza alias Rofina Theodosia Pereira alias Rofina Theodosia D'Souza alias Rofina Theodeosia Pereira De Souza alias Rofina Theodosia De Souza alias Rofina Teodosia de Souza alias Rofina Teodozia Pereira Souza alias Rofina Theodosia alias Rofina Teodoria Pereira, hailing from Village Marna, Bardez, Goa.

**SCHEDULE**

'I'

All that property surveyed under Survey No. 54/8 of the village Marna, which is within the limits of Village Panchayat of Marna Siolim, Sub- District of Bardez Taluka, District of North Goa, State of Goa, admeasuring 1,725 square meters, along with a house bearing No. 151/6 admeasuring 200 square meters approx. The said Property is bounded as under:
EAST: by Survey No. 54/9;WEST: by Survey No. 54/7;NORTH: by survey No. 53/34 and 53/35;andSOUTH: by Road.

'II'

All that property surveyed under Survey No. 85/6 of the village Marna, which is within the limits of Village Panchayat of Marna Siolim, Sub- District of Bardez Taluka, District of North Goa, State of Goa, admeasuring 1,775 square meters. The said Property is bounded as under:
EAST: by Survey No. 85/7;WEST: by Survey No. 85/5;NORTH: by Road; and SOUTH: by Road and Survey No. 85/15.

'III'

All that property surveyed under Survey No. 63/15 of the village Marna, which is within the limits of Village Panchayat of Marna Siolim, Sub- District of Bardez Taluka, District of North Goa, State of Goa, admeasuring 5,400 square meters. The said Property is bounded as under:
EAST: by Survey No. 63/16;WEST: by Survey No. 63/14;NORTH: by Survey No. 63/6, 63/7 and 63/8; and SOUTH: by Road.

'IV'

All that property surveyed under Survey No. 83/6 of the village Marna, which is within the limits of Village Panchayat of Marna Siolim, Sub- District of Bardez Taluka, District of North Goa, State of Goa, admeasuring 5,600 square meters. The said Property is bounded as under:
EAST: by Survey No. 83/7;WEST: by Survey No. 83/5;NORTH: by Road; and SOUTH: by property Survey No. 86.

'V'

All that property surveyed under Survey No. 91/2 of the village Marna, which is within the limits of Village Panchayat of Marna Siolim, Sub- District of Bardez Taluka, District of North Goa, State of Goa, admeasuring 450 square meters. The said Property is bounded as under:
EAST: by Survey No. 91/3;WEST: by Survey No. 91/1;NORTH: by Road; and SOUTH: by Survey No. 91/5;

Any person/s, bank/s, financial institution/s or entity/ies having any right, claim, title or interest of whatsoever nature in or over or in respect of the said properties described in the **SCHEDULE** above by way of sale, inheritance, gift, lease, assignment, mortgage, charge, lien, encumbrances, easement or any other right of whatsoever nature may lodge their claims/objections in writing to the above proposed sale in favour of my client, through me at the below-mentioned address, with documentary proof in support of such claims/objections within a period of **Fifteen (15) Days** from the date of publication hereof, failing which it shall be deemed that there are no claims/objections from anyone whomsoever to the proposed sale, and my client shall thereafter be free to complete the sale as a bonafide purchaser for value, without any reference to such claims/objections, which please note.

Sd/- **Adv. Sunita M. Kinalkar**
Office: A/S-12, 2nd Floor, Block A, Campal Trade Centre, Panaji, Goa, 403001. Ph. 9822600827
email: sunita.kinalkar@gmail.com



Email : cbicourt-ngdc.goa@nic.in
Phone: 2264250/2264251
DJ-2/MAP/Civil/EXA 213/2021/2025/ 887
Dated: 16.04.2025
To be publish on Local Daily Newspaper (U/o V r. 20 CPC)

IN THE COURT OF DISTRICT JUDGE-2, RAJ RAUNAK BUILDING, MAPUSA
(Before Shri. Ram S. Prabhudessai, District Judge-2 Mapusa)

**Execution Application No. 213 / 2021**

The Lokmanya Multipurpose Co-operative Society (Multi-state) ....Decree Holder

V/s

Shri Govind Madhu Dhargalkar & 4 Ors. .... Judgment Debtors

**NOTICE**

To, The Judgment Debtor No. 2
Shri Ambrose Dsouza (Mem No.164958)
® H No.258, Padri Wado, Gauvim, Thivim, Bardez-Goa,
(O) Hotel La CALYPSO, Saunta Wado, Baga, Calangute, Goa 403516.

WHEREAS, the above named Decree - Holder have instituted a Execution Application against you.

AND WHEREAS, notices have been issued to you returned unserved with the endorsement that whereabouts are not known.

AND WHEREAS, Adv. Ms. N. Shivolkar, advocate for the Decree-Holder have filed an application in this Court praying that you be served by Substituted service by publication in the Daily Newspaper circulating in the locality on which the said JD No. 2 was last known to have actually and voluntarily resided.

AND WHEREAS, this Court is satisfied that this is a fit case for ordering such a service.

NOW, therefore, notice is hereby given to you under order V Rule 20 (A) of C.P.C. to appear before the Court of District Judge-2 & Addl. Sessions Judge, Mapusa, Raj Raunak Bldg. Shetye Waddo, Duler Mapusa either in person or by a pleader duly instructed, if any on **2nd day of May, 2025 at 10.00 a.m.**

TAKE FURTHER, notice that in default of your appearance on the day and time aforementioned, the matter will be heard and determined in your absence.

GIVEN under my hand and the Seal of the Court, this 19th day of the Month of April, 2025.

**Sd/- (Ram S. Prabhudessai)** SEAL
**District Judge-2 & Addl. Sessions Judge, Mapusa**


# केरीत ब्रह्मचर्याश्रम निवासी वर्गाचे उद्घाटन

■ *टीम दैनिक हेराल्ड*



केरी : निवासी प्राथमिक ब्रह्मचर्याश्रम वर्गाचे उद्घाटन करताना वेदमूर्ती मकरंद घैसास. बाजूला संतोष गावकर, मनोहर देसाई , सर्वेश जोशी व सुभाष जाण.

**सावईवेरे, दि.२१** : केरी – फोंडा येथील श्री विजयादुर्गा देवस्थान व श्री विजयादुर्गा सांस्कृतिक मंडळ यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या २६ व्या प्राथमिक ब्रह्मचर्याश्रम निवासी वर्गाचा उद्घाटन सोहळा येथील देवस्थानच्या अन्नपूर्णा सभागृहात थाटात झाला. सदर वर्ग ११ मे पर्यंत चालणार आहे.

उद्घाटन सोहळ्यास व्यासपीठावर मुख्य अतिथी म्हणून वेदमुर्ती मकरंद घैसास, श्री विजयादुर्गा संस्थानचे मुखत्यार संतोष गावकर, देवस्थानचे सचिव मनोहर देसाई, सांस्कृतिक मंडळाचे सचिव सर्वेश जोशी, प्रा. सुभाष जाण आणि वर्गाचे शिक्षक वेदमूर्ती मयुरेश काणे आदी उपस्थित होते.

मकरंद घैसास म्हणाले की, वेद हे आपल्या सनातन हिंदू धर्माचे मूल्य असल्याने वेदाध्ययन हे सनातन धर्माच्या परंपरेत अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. वेदांचा अभ्यास केल्याने व्यक्तीला ज्ञान, धार्मिकतेचा व संस्कृतीचा अनुभव मिळतो. त्यासाठी आपली वैदिक संस्कृती जतन करणे हे पालकांचे तसेच मुलांचेही कर्तव्य आहे. वेद टिकावे म्हणून आपल्या ऋषीमुनींनी ऋचा संगीतबद्ध व लयबद्ध केलेली आहे. जेणेकरून ते आपल्या जिभेवर सतत नांदेल. त्यामुळे भविष्यात धार्मिक पुस्तके जरी नष्ट झाली तरी वाणी हे कायम टिकणारे भूषण आहे. गेली २६ वर्षे बटुंना प्राथमिक ब्रह्मचर्य वर्गाच्या माध्यमातून मुलांवर संस्कार करीत त्यांच्या वाणीवर व मनावर आपल्या प्राचीन संस्कृतीची ओळख करून देण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य देवस्थान करीत असल्याने त्यांनी देवस्थान समितीचे भरभरून कौतुक केले.

प्रा. सुभाष जाण यांनी वर्गाच्या आजपर्यंतच्या वाटचालीत बटुंचे तसेच त्यांच्या पालकांच्या योगदानाबद्दल बोलताना त्यांचे आभार मानले.

प्रास्ताविक, स्वागत व पाहुण्यांची ओळख मनोहर देसाई यांनी केले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने वर्गाचे उद्घाटन करण्यात आले. सूत्रनिवेदन योगेश गोब्रे यांनी केले तर सर्वेश जोशी यांनी आभार मानले. या सोहळ्यास बटुंसह त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**पाहिजेत**

Hiring heavy bulker drivers in Goa. Salary ₹30,000/month. Dilip 7498014029.